# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

## परिपत्रक क्र:पवमूमाविगोक/२०२४-२५/

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थाचे संचालक यांना कळविण्यात येते की, **मार्च/एप्रिल-२०२५** मध्ये होणाऱ्या पदवी अभ्यासक्रम परीक्षा दिनांक ०८.०४.२०२५ पासून घेण्यात येणार आहेत. व पदव्युत्तर परीक्षा चे दिनांक लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

सर्व महाविद्यालयाना विद्यापीठाच्या **www.bamua.digitaluniversity.ac** या संकेतस्थळावर **(QPDS) Link** देण्यात आलेली आहे. तरी सर्व महाविद्यालयानी त्यांची पुर्ण माहिती **Online** पध्दतीने **दिनांक. २६.०३.२०२५** पर्यंत भरावी. सदर माहिती ही सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, व्यावसाईक, अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र व इतर सर्व अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी **(QPDS) Link** मध्ये माहिती भरणे आवश्यक व अनिवार्य आहे. तसेच दिनांक ०१.०४.२०२५ पासून (Mock Drill) डेमो घेण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**(QPDS) लॉगीन बाबात महत्वाच्या सूचना :-**

**०१. Google Information Form (QPDS) Link मध्ये माहिती भरत असताना फक्त प्राध्यापकानीच लॉगीन मध्ये माहिती भरावी. ज्या प्राध्यापकास परीक्षा केंद्रप्रमुखाची जवाबदारी देण्यात आलेली आहे. त्यांनीच प्रश्नपत्रिका Download करणे बंधनकारक आहे. त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणिही लॉगीन ID आणि पासवर्डचा वापर करु नये अन्यथा या बाबत गैर समजण्यात येईल व लॉगीन बंद करण्यात येईल. निदर्शनास अल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.**

**०२. लॉगीन मध्ये फोटो अपलोड करत असताना प्राचार्य आणि ज्या प्राध्यापकास केंद्रप्रमूखची जबाबदारी देण्यात आलेली आहे त्यांचेच फोटो अपलोड करण्यात यावेत.**

**०३. Google Information Form (QPDS) Link लॉगीन मध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याची माहिती भरु नये. याचा अधिकार फक्त प्राध्यापक परीक्षाकेंद्र प्रमूखास राहील याची नोंद घ्यावी.**

**०४. महाविद्यालयास पाठविण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिका कक्षामध्ये फक्त केंद्रप्रमूखांनाच मोबाईल वापरण्यास परवानगी राहील परीक्षा कक्षामध्ये इतर कोणालाही मोबाईलचा वापर करता येणार नाही, जर काही गैरप्रकार झाल्यास प्राचार्य व परीक्षा केंद्रप्रमूख जबाबदार राहील याची नोंद गांभीर्याने घ्यावी.**

**०५. तसेच परीक्षा सुरू झाल्यानंतर उपस्थीती/अनुउपस्थीती त्याच दिवशी लॉगीनमध्ये नमूद करण्यासाठी एका प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात यावी जेणे करुन निकाल लावण्यास सोइस्कर होईल.**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chh. Sambhajinagar

वरील सूचनेप्रमाणे परीक्षेसाठी माहिती भरत असतांना फक्त प्राचार्य आणि केंद्र प्रमुखांनीच माहिती भरणे बंधनकारक राहील. महाविद्यालयाने सादर केलेल्या माहितीनुसार (QPDS) लॉगीन देण्यात येईल. लॉगीन दिल्यानंतर सदरबाब महाविद्यालयाचे प्राचार्य/परीक्षा केंद्रप्रमुख यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीस याची माहिती नसावी, या सबंधी गोपनियतेचे पालन करण्यात यावे. महाविद्यालयाकडून (QPDS) लॉगीन बाबत गैरवापर झाल्यास सबंधीत प्राचार्य/परीक्षा केंद्रप्रमुख जवाबदार असतील, व सदर परीक्षेच्या कामात काही गैरप्रकार आढळल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**तसेच आपणास असेही कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल-२०२५ मध्ये दरवर्षीप्रमाणे घेण्यात येणाऱ्या पदवी Compulsory 1) Computer Course & 2) Environmental Studies 3) Constitution of India या विषयाची परीक्षा देखील पदवी अभ्याक्रमासाठी घेण्यात येणार आहे. यासाठी सर्व महाविद्यालयांनि (QPDS) Link) मध्ये माहिती भरणे अनिवार्य आहे. वरील क्र. १,२,३, या तीन विषयाच्या परीक्षाच्या तारखा लवकर जाहीर करण्यात येणार आहेत.**

**वरील तीन विषयांची परीक्षा परीक्षार्थींचा प्रवेश ज्या महाविद्यालयात आहे त्या महाविद्यालयातच घेण्यात येतील. इतर सर्व विषयासाठी चे वेगळे वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर करण्यात येतील. याची नोंद सर्व संबंधीतांनी घ्यावी.**

एखाद्या महाविद्यालयाने माहिती सादर न केल्यास, अशा महाविद्यालयांचे विद्यार्थी परीक्षपासून वंचीत राहतील, त्यामुळे सर्व महाविद्यालयांनी माहिती सादर करणे अनिवार्य व क्रमप्राप्त आहे, तसेच याऊपरही एखाद्या महाविद्यालयान माहिती सादर न केल्यास व विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्याची राहील. याची कृपया कटाक्षाने नोंद घ्यावी.

सदर माहिती ही अचूक भरणे बाबतची दक्षता/नोंद सर्व प्राचार्य/परीक्षा केंद्र प्रमुख यांनी घ्यावी व माहिती विहित मुदतीत भरुण विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावे.

Bhate

संचालक

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**विद्यापीठ प्रांगण,**

**छत्रपती संभाजीनगर**

संदर्भ क्र: परीक्षा व मूल्यमापन/गोपनिय/२०२५/३५५५

दिनांक;-०७.०३.२०२५

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chh. Sambhajinagar